## तांत्रिक मान्यता आदेश

" अर्थसंकल्पीय अंदाज २०१८-१९,जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च (४५) जिल्हा योजना अहमदनगर (४५) (०२) ग्रामिण रस्ते विकास व मजबूतीकरण " अंतर्गत कामाचा तांत्रिक मान्यता आदेश...

**जिल्हा परिषद अहमदनगर**
**सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग अहमदनगर**
**क्र.बांध/कार्या/बांध/प्रशा-१/१६६/२०१८ दि.१५/१२/२०१८**

**वाचा** :- १) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग निर्णय क्र.झेडपीए/२०१५/प्र.क्र.१९१/पं.रा.८ दि.३/१/२०१६.
२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग निर्णय क्र.झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९ दि.७/१०/२०१७.
३) मा.कार्यकारी अभियंता जि.प.(सा.बां.)दक्षिण विभाग अ'नगर यांचा प्रशासकीय मान्यता आदेश क्र.बांध/प्रशा-१/१७(१ते५)/२०१८ दि.२८/११/२०१८ १०.०० लक्ष

### *तांत्रिक मंजूरी आदेश*

कार्यकारी अभियंता यांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये, वरील कामास १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लक्ष मात्र) तांत्रिक मंजूरी नोंदवहीच्या आदेश क्र.बांध/प्रशा-१/१६६/२०१८ दि.१५/१२/२०१८,अन्वये खालील अटींना अधीन राहून तांत्रिक मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.न. | लेखाशिर्ष | तालुका | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | ५०५४ | नगर | हिंगणगाव ते खातगाव रस्ता नविन पूलासह मजबूती.करणे.(ग्रामा-२१५)सा.क्र.०/० ते २/० | १०.०० |

उपरोक्त कामाचे रू १०,००,०००/- अक्षरी रू. दहा लक्ष फक्त इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रकास संदर्भ क्र. २ अन्वये दिलेल्या अधिकारानूसार या आदेशान्वये तांत्रिक मंजुरी देण्यात येत आहे.

सदरचा आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र २०१८१२१५१२०७०० असा आहे.

कार्यकारी अभियंता
जि.प.सा.बां.दक्षिण विभाग अ.नगर

---

**वरील कामाचे अंदाजपत्रकास, खालील अटींना अधीन राहून, तांत्रिक मंजूरी देण्यात येत आहे.**

१) सदरचे काम हे ज्या योजनेखाली मंजूर झाले आहे, त्या योजनेबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेश/नियमांचे पालन करावे.
२) सदर कामांसाठी निधी व कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्याशिवाय कामे सुरु करण्यात येउ नयेत.

Scanned by CamScanner

३) रस्त्याचे काम सुरु करणेपूर्वी, ते इतर कोणत्याही योजनेतून यंत्रणेमार्फत प्रस्तावित/मंजूर/प्रगतीत/पूर्ण नाही याची व या कामासाठी पुरेशी जागा जि.प.च्या मालकीची असलेबाबत खात्री करावी व नियमानुसार आखणी करुन द्यावी.

४) अस्तित्वातील खडीच्या जाडीचा तक्ता अंदाजपत्रकास जोडावा. पूर्वीच्या खडीच्या रस्त्यावर काम करण्यापूर्वी,अस्तित्वातील खडीची जाडी (Crust) मोजून तशी मोजमाप पुस्तिकेत नोंद करावी.

५) रस्त्याच्या कामावर अंदाजपत्रकात नमूद केलेल्या दगडाच्या खाणीतील योग्य आकाराची व अंदाजपत्रकातील परिमाणाइतकी खडी जमा केल्यानंतर, ती पसरवण्यापूर्वी अन्य उपअभियंताकडून तपासणी करुन घ्यावी व तशी नोंद मोजमाप पुस्तिकेत करावी.

६) रोड साईड गटरचे काम सेक्शनमध्ये करावे व त्यानुसार मापे नोंदवावीत. रस्त्याची मापे २०० मी. साखळी क्रमांकानुसार नोंदवावीत.

७) अंदाजपत्रकातील कोणत्याही बाबीमध्ये सक्षम अधिका-याच्या लेखी परवानगीशिवाय बदल करण्यात येऊ नये.तसेच मंजूर वाव आणि साखळी क्रमांकात परस्पर बदल करु नये. स्थळदर्शक नकाशानुसार काम करावे.

८) काम मुदतीत व चांगले दर्जात पूर्ण करण्यात यावे. कामाच्या गुणवत्ता व दर्जाची तपासणी, कार्यकारी अभियंता व संबंधित एस.क्यू.एम. यांचेकडून वेळोवेळी करुन घेण्यात यावी. योजनेचा फलक काम सुरु होताच,रस्त्यावर लावण्यात यावा.

९) कामासाठी वापरण्यात येणा-या साहीत्याची, ते वापरण्यापूर्वी वेळोवेळी व मापदंडानुसार जि.प. गुणनियंत्रण प्रयोगशाळेकडून तपासणी करुन चाचणी अहवाल प्राप्त करुन घ्यावेत. त्याची मूळ प्रत देयकासोबत सादर करावी व गुणनियंत्रण नोंदवह्या अद्यावत ठेवाव्यात.

१०) अंतिम देयकासोबत सदर कामाचे रेकॉर्ड ड्रॉईंग व फोटोग्राफ्स (काम सुरु होणेपूर्वी, काम चालू असताना व पूर्ण कामाचे-योजनेच्या फलकासह सादर करण्यात यावेत. तसेच या कामांचे फोटो जि.प.च्या निर्माण.कॉम या संकेतस्थळावर वेळोवेळी अपलोड करावेत.

११) काम पूर्ण झाल्यानंतर त्याची स्थावर मालमत्ता नोदवहीत नोंद घेउन, बारचार्ट अद्यावत करावा.

सही/- xx

**कार्यकारी अभियंता**

**जि.प.सा.बां.दक्षिण विभाग अ.नगर**

प्रत :- १. उपअभियंता जि.प.(सा.बां.) उपविभाग नगर,यांना पुढील कार्यवाहीस्तव..

२. लेखा शाखा जि.प.सा.बां.दक्षिण विभाग अहमदनगर यांना पुढील कार्यवाहीस्तव..

Scanned by CamScanner